ग्रामीण कृषि मौसम सेवा
अखिल भारतीय समन्वयीत कृषी हवामानशास्त्र संशोधन प्रकल्प
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी – ४३१ ४०२
ईमेल - amfuparbhani@gmail.com

## मराठवाडा कृषि हवामान सल्ला पत्रक क्रमांक – ३/२०२५- २०२६ मंगळवार, दिनांक – ०८.०४.२०२५

### मराठवाडयाकरीता चालू आठवडयातील हवामान अंदाज (दिनांक ०९ ते १३ एप्रिल २०२५)

| हवामान घटक | जिल्हयाचे नाव | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | छ. संभाजी नगर | जालना | बीड | लातुर | धाराशिव | परभणी | हिंगोली | नांदेड |
| पाऊस (मिमी) | ०.० | ०.० | २.० | ३.० | ३.० | २.० | ०.० | ३.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३८.०-४१.० | ३८.०-४०.० | ३९.०-४२.० | ३८.०-४०.० | ३७.०-३९.० | ४०.०-४२.० | ३९.०-४०.० | ४०.०-४२.० |
| किमान तापमान (अं.से.) | २३.०-२७.० | २३.०-२७.० | २१.०-२४.० | २२.०-२४.० | २१.०-२३.० | २१.०-२४.० | २१.०-२३.० | २१.०-२३.० |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ ते अंशत: ढगाळ | स्वच्छ ते ढगाळ | स्वच्छ ते अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ ते ढगाळ | अंशत: ढगाळ ते ढगाळ | स्वच्छ ते अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ ते ढगाळ | स्वच्छ ते अंशत: ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | २९-४७ | ३४-३५ | ४०-४२ | ५७-५९ | ६४-६५ | ४९-५१ | ६४-६६ | ४६-४८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७-१६ | १४-१५ | २५-२६ | १५-१६ | २८-२९ | २५-२६ | ९-११ | १०-१४ |
| वा-याचा वेग (किमी/तास) | ४-१४ | ६-१६ | ११-१४ | ८-१७ | १०-१२ | ९-१० | ५-१३ | ५-१५ |
| वा-याची दिशा | नैऋत्य ते वायव्य | नैऋत्य ते वायव्य | दक्षिण-नैऋत्य ते वायव्य | दक्षिण-नैऋत्य ते उत्तर-वायव्य | दक्षिण ते उत्तर-वायव्य | दक्षिण-नैऋत्य ते पश्चिम-वायव्य | दक्षिण-नैऋत्य ते वायव्य | दक्षिण-नैऋत्य ते पश्चिम-वायव्य |

**हवामान सारांश / चेतावनी :**
प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार पुढील तीन दिवसात मराठवाड्याच्या दक्षिण- पूर्व भागात तूरळक ठिकाणी वादळीवाऱ्यासह हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक ०८ व ०९ एप्रिल रोजी छत्रपती संभाजी नगर व जालना जिल्हयात तूरळक ठिकाणी रात्र उबदार राहील. मराठवाडयात पुढील दोन ते तीन दिवसात कमाल तापमानात हळूहळू १ ते २ अं.से. ने वाढ होऊन त्यानंतर हळूहळू २ ते ३ अं.से. ने घट होण्याची तर पुढील तीन दिवसात किमान तापमानात हळूहळू २ ते ३ अं.से. ने वाढ होऊन त्यानंतर फारशी तफावत जाणवनार नाही.

**सामान्य सल्ला :**
विस्तारीत अंदाजानुसार (ईआरएफएस) मराठवाडयात दिनांक ११ ते १७ एप्रिल २०२५ दरम्यान पाऊस सरासरीएवढा, कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी व किमान तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.
सॅक, इसरो अहमदाबाद यांच्या उपग्रहाच्या बाष्पोत्सर्जनाच्या जिल्हानिहाय व तालूकानिहाय छायाचित्रानूसार मराठवाडयात बाष्पोत्सर्जनाचा वेग वाढलेला आहे.

**संदेश :** वाढत्या तापमानामूळे व वाढलेल्या बाष्पोत्सर्जनाच्या वेगामूळे पिकात, फळबागेत, भाजीपाला व फुल पिकास आवश्यकतेनूसार सकाळी किंवा संध्याकाळी पाणी व्यवस्थापन करावे.

| पिकांचे नाव | अवस्था | कृषी हवामान सल्ला |
|---|---|---|
| रब्बी ज्वारी | साठवणूक | मळणी केलेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| गहू | साठवणूक | मळणी केलेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| हळद | काढणी, उकडणे, पॉलिश करणे, वाळवणे | काढणीस तयार असलेल्या हळद पिकाची काढणी करून घ्यावी. काढणी केलेल्या हळद पिकाची उकडणे, वाळवणे व पॉलीश करणे ही कामे करून मालाची सुरक्षित ठिकाणी (गोदामात) साठवणूक करावी. |
| उन्हाळी भुईमूग | फुलोरा ते आऱ्या लागणे | उन्हाळी भुईमूग पिकात आवश्यकतेनूसार तुषार सिंचन पध्दतीने पाणी व्यवस्थापन करावे. उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या (मावा, तुडतुडे, फुलकीडे व पांढरी माशी) कीडींना आकर्षीत करण्यासाठी एकरी १० ते १२ पिवळे व निळे चिकट सापळे लावावेत व तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचे व लाल केसाळ अळीचे समूहातील अंडी लहान अळया हाताने वेचून नष्ट कराव्यात. उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंवा ॲझाडिरेक्टिन (३० पीपीएम) ३ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| केळी | फळ वाढीची ते काढणी | घड लागलेल्या केळी झाडांना काठीने आधार द्यावा. काढणीस तयार असलेल्या केळीच्या घडांची काढणी लवकरात लवकर करून घ्यावी. केळी बागेस आवश्यकतेनूसार सरी वरंब्याने पाणी द्यावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी केळी फळझाडाच्या आळयात आच्छादन करावे. नविन लागवड केलेल्या केळीच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी. |
| आंबा | फळवाढीची ते काढणी | काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची काढणी लवकरात लवकर करून घ्यावी. आंबा बागेत आवश्यकतेनूसार पाणी व्यवस्थापन करावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी आंबा फळझाडाच्या आळयात आच्छादन करावे. नविन लागवड केलेल्या आंब्याच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी. आंबा बागेत जिब्रेलिक ॲसिड १ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| द्राक्ष | काढणी/ एप्रिल छाटणी पुर्व | काढणी राहिलेल्या द्राक्ष फळांची काढणी करून घ्यावी. द्राक्ष बागेत एप्रिल छाटणीची पुर्व तयारी करून घ्यावी. द्राक्ष बागेतील माती मोकळी करून खत व्यवस्थापन करावे. |
| भाजीपाला | वाढीची / काढणी | काढणीस तयार असलेल्या भाजीपाला, टरबूज, खरबूज पिकांची काढणी करून घ्यावी. भाजीपाला पिकात खूरपणी करून भाजीपाला पिक तण विरहीत ठेवावे. नविन लागवड व पूर्नलागवड केलेल्या रोपांना आवश्यकतेनूसार पाणी व्यवस्थापन करावे. भाजीपाला ( मिरची, वांगे व भेंडी) पिकात रसशोषण करणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यस्थापनासाठी पायरीप्रॉक्सीफेन ५% + फेनप्रोपाथ्रीन १५% १० मीली किंवा डायमेथोएट ३०% १३ मीली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| फुलशेती | काढणी | फुल पिकात खूरपणी करून फुल पिक तण विरहीत ठेवावे.काढणीस तयार असलेल्या फुलांची काढणी करून बाजार पेठेत पाठवावी. |
| पशुधन व्यवस्थापन | ---- | आपल्या पशुंना उन्हामध्ये बांधु नका (निदान तिव्र उन्हाच्या कालावधीमध्ये त्यांना झाडाखाली/सावलीमध्ये किंवा शेड/गोठ्यामध्येच बांधणे चांगले). पशुंना शक्यतो थंड/स्वच्छ/मुबलक पाणी दोन-तिन वेळेस पाजावे. पाण्यामुळे पशुंच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी (डीहायड्रोजन) होणार नाही. जमल्यास पाण्यामधून क्षार द्यावेत , ५ लिटर पाण्यामध्ये चिमुटभर गुळ (२५ ग्रॅम), थोडे मिठ (५ -१० ग्रॅम) आणि ५ ग्रॅम क्षार मिश्रण दिल्यास उत्तम, मात्र नजीकच्या पशुवैद्यकाचा सल्ला घेऊनच व्यवस्थापन करावे. |

सदर कृषी हवामान सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.

मुख्य प्रकल्प समन्वयक
ग्रामीण कृषी मौसम सेवा
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी